# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक-१
## सभावृत्तांत

दिाांक - ०६.०७.२०१० वेळ- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीची पहिली सभा (विशेष सभा) मंगळवार दिनांक ०६.०७.२०१० रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.आर.के.गायकवाड अप्पर जिल्हाधिकारी पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.साबळे जगन्नाथ दगडू
२. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
३. मा.कुमार.आर.एस.
४. मा.प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर
५. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
६. मा.सावळे सिमा

याशिवाय मा.देशमुख - सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन अधिकारी)** मी आर.के.गायकवाड अप्पर जिल्हाधिकारी पुणे याठिकाणी सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीच्या सभापतींची नेमणुक करणेचा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त पुणे यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणुन माझी याठिकाणी नेमणुक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आलेली आहे.

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक १ - मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीच्या सभापतींची नेमणुक करणे. मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीचे सभापती पदावर नेमणुक करणेकामी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | साबळे जगन्नाथ दगडू | कुमार आर.एस. | चौधरी अख्तरहुसेन तालुकदार |
| २) | साबळे जगन्नाथ दगडू | सुपे भाऊसाहेब रामभाऊ | सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण |

[ मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली उपरोक्त दोन नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा.पिठासीन अधिकारी यांनी त्याची छाननी केली. ]

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन अधिकारी)** मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त दोन नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असुन ती नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.साबळे जगन्नाथ दगडू हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १
दिनांक-०६.०७.२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती सभापती पदासाठी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली असुन वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. साबळे जगन्नाथ दगडू हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.साबळे जगन्नाथ दगडू** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
**( आर.के.गायकवाड )**
अप्पर जिल्हाधिकारी- पुणे
पिठासीन अधिकारी
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण
आणि समाजकल्याण समिती
(विशेषसभा)

---------

(नवनिर्वाचित सभापती मा. साबळे जगन्नाथ दगडू यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक २ - मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीच्या उपसभापतींची नेमणुक करणे.
मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीचे उपसभापती पदावर नेमणुक करणेकामी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
| --- | --- | --- | --- |
| १) | चौधरी अख्तरहूसेन तालुकदार | सुपे भाऊसाहेब रामभाऊ | साबळे जगन्नाथ दगडू |
| २) | चौधरी अख्तरहूसेन तालुकदार | कुमार आर.एस. | सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण |

[ मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली उपरोक्त दोन नामनिर्देशनपत्रे मा.सभापती यांच्याकडे सुपूर्द केली. मा.सभापती यांनी त्याची छाननी केली. ]

**मा.सभापती**- मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीचे उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त दोन नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असुन ती नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.चौधरी अख्तरहूसेन तालुकदार हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - २
दिनांक-०६.०७.२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती उपसभापती पदासाठी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली असुन वैध ठरलेली आहेत त्यामध्ये मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.चौधरी अख्तरहूसेन तालुकदार हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीचे उपसभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण
आणि समाजकल्याण समिती

ठराव क्रमांक :- ३ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- ०६.०७.२०१०

सूचक :- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक :-मा.अख्तरहुसेन चौधरी

मा.झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी दुपारी २.०० वाजता विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्ट्या असलेस त्या सुट्टी/सुट्ट्यानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० वाजता सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्यावेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(साबळे जगन्नाथ दगडू)
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाजकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/९७१/१०
दिनांक- ०६/०७/२०१० चे लगत

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.